# आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्त मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन

रत्नागिरी, ८ मार्च (वार्ताहर)- आंतरराष्ट्रीय महिलादिनाचे औचित्य साधून फिनोलेक्स पाईप्स यांच्या सामजिक बांधिलकीमध्ये सहभागी असणारी मुकुल माधव फाऊंडेशन आणि परकार हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर, रत्नागिरी यांचेवतीने स्त्रीयांच्या स्तनाचे कर्करोग निदान शिबीर दिनांक ८ मार्च ते १५ मार्च २०१५ या कालावधीमध्ये सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत परकार हॉस्पिटल रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराची सुरुवात परकार हॉस्पिटल रत्नागिरी येथे रविवारी सकाळी करण्यात आली. पहिल्याच दिवशी महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मागील वर्षी मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स यांचे श्रेयाने महिलांसाठी रत्नागिरी येथे कर्करोगाची चिकित्सा करणेकरिता सुविधा होणेच्या दृष्टीने परकार हॉस्पिटल रत्नागिरी यांना मॅमोग्राफी आणि कोलोस्कॉपी यंत्र देणगी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

या शिबिराच्या कालावधीमध्ये ३५ वर्षावरील महिलांची चाचणी होणार आहे. सुरुवातीच्या काळात रत्नागिरीच्या महिलांना मुंबई किंवा कोल्हापूर येथे अशा चाचणींकरिता जावे लागत होते व सुविधा रत्नागिरी येथे उपलब्ध नसल्याने बऱ्याच महिला अशा चाचण्या करणेस अधिक खर्चिक व वेळेचा अपव्यय लक्षात घेता टाळाटाळ करीत होत्या साहजिकच त्याचा दुष्परिणाम नंतर त्यांचे प्रकृतीवर होत होता.

प्रशांती कॅन्सर केअर मिशन, पुणेचे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. सी. बी. कोप्पीकर हे परकार हॉस्पिटल, रत्नागिरी येथे नियमीत उपस्थित राहणार आहेत. तसेच चिकित्सांचे अहवाल व मुल्यांकत हे प्रशांती कॅन्सर केअर टीम, पुणे यांच्यामार्फत ऑनलाईन होणार आहे.

महिलादिनाच्या निमित्ताने ८ मार्च ते १५ मार्च २०१५ कालावधीमध्ये विशेष सवलतीच्या दरात चिकित्सा करण्यात येणार आहे. फिनोलेक्स पाईप्सने प्रथम येणाऱ्या २०० गरीब व गरजू महिलांना या शिबिरामध्ये चिकित्सेकरिता सहभागी होणेकरिता स्वेच्छेने प्रायोजकत्व घेतले असून जास्तीत जास्त महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुकुल माधव फाऊंडेशनच्यावतीने करण्यात येत आहे.